पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
©: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 1092
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक / Date : 15 MAY 2023

# सुधारीत परिपत्रक क्रमांक 20

संदर्भ
१) प्रस्तुत विद्यापीठाचे परीपत्रक क्र. १९/२०२३, जा.क्र. पुअहोसोविसो/ पवमूमं/९९३, दिनांक १०/०५/२०२३
२) प्रस्तुत विद्यापीठाचे परीपत्रक क्र.१०७/२०१९, जा क्र.पुअहोसोविसो/परीक्षा/२०१९-२०/२३१४, दिनांक ०४/११/२०१९

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक / विद्यापीठ परिसर संकुल संचालक यांना संदर्भ क्र. १ नुसार सर्व विद्यार्थ्यांच्या मार्च/एप्रिल-२०२३ च्या विद्यापीठ प्रात्यक्षिक (Practical) परीक्षा घेण्याचे आयोजन करून दिनांक २५/०५/२०२३ पर्यंत प्रात्यक्षिक (Practical) परीक्षेचे गुण अपलोड करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तथापी, विद्यापीठ प्रात्यक्षिक (Practical) परीक्षेचे गुण संगणक प्रणालीमध्ये अपलोड कसे करावे याबाबत निर्देश देण्यात आलेले नव्हते. त्या करीता सदरचे सुधारीत परिपत्रक निर्गमीत करण्यात येत आहे. संदर्भ क्रमांक २ मध्ये दिलेल्या खालील सर्व परीक्षा

| अ.क्र. | विद्याशाखानिहाय विषयांचे नाव | Exam Category | Assesment Type |
|---|---|---|---|
| १. | सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यापीठ प्रात्यक्षिक परीक्षा | Practical | UA |
| २. | Compulsory Physical Education | Practical | UA |
| ३. | सर्व अभ्यासक्रमाच्या Viva Voce/ Project Dissertation & Seminar | Theory/Practical | UA |

घेवून त्यांचे गुण महाविद्यालयांना देण्यात आलेल्या लॉगीन मधून विद्यार्थ्यांच्या पीआरएन (PRN) च्या आधारे व उपलब्ध असल्यास बैठक क्रमाकाच्या आधारे ज्या त्या वर्गाच्या विद्यापीठ थेअरी परीक्षा सुरु होण्यापुर्वी संदर्भ क्र. २ च्या परिपत्रका प्रमाणे दोन दिवस अगोदर अपलोड करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

वरील संदर्भ क्र. १ व २ च्या परिपत्रकामध्ये नमुद केलेल्या सर्व विद्यापीठ परीक्षा या महाविद्यालय स्तरावर विद्यापीठ नियमानुसार अंतर्गत/बहिस्त पर्यवेक्षक व इतर बाबीची पुर्तता करून संदर्भ क्रमांक २ मधील सर्व परीक्षांचे नियोजन प्रस्तुत महाविद्यालायाच्या निगराणी खाली करण्यात यावे. सदर विद्यापीठ परीक्षेकरिता खालील निर्देशाचे पालन करण्यात यावे.

१) सर्वप्रथम अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन करण्यात यावे. व त्यानंतर इतर सत्रांच्या प्रात्यक्षिक परीक्षा घण्याचे नियोजन करण्यात यावे.

२) सदर परीक्षेकरिता अंतर्गत व बहिस्थ परीक्षकांची नेमणूक संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य मार्फत करण्यात यावी.

३) प्रात्यक्षिक परीक्षेकरिता लागणारे साहित्य (स्टेशनरी व इतर साहित्य ) संबंधित महाविद्यालयांनी प्रस्तुंत विद्यापीठाच्या गोडावून विभागाकडून घेऊन जाण्याचे नियोजन करण्यात यावे.

४) अनु क्रमांक १ ते ३ च्या परीक्षेकरिता काम करणा-या सर्व संबंधित कर्मचारी वर्गास विद्यापीठ परीक्षेचे सर्व नियम लागू राहतील

५) तसेच ज्या महाविद्यालयाकडे संबंधीत विषयाचा नियमित शिक्षक नसेल तर त्यांनी इतर महाविद्यालयाच्या नियमित शिक्षकाची अंर्तगत परीक्षक म्हणून संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी नेमणूक करावी.

६) याबाबत काही अडचणी निर्माण झाल्यास विद्यापीठाच्या संबंधीत विभागाशी संपर्क साधावा.

( डॉ शिवकुमार गणपूर )
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,

१) प्राचार्य, प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक / विद्यापीठ परिसर संकुल संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

२) प्रस्तुत विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन विभागातील संगणक विभागाने पीआरएन द्वारे गुण भरण्याकरिता सॉफ्टवेअर मध्ये लिंक उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच महाविद्यालयीन स्तरावरील तांत्रिक बाबींची पुर्तता दिनांक १६/०५/२०२३ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत पुर्तता करावी.